दावा दाखल तारीख – ०८/०९/२०२५
दावा नोंद तारीख - ०९/०९/२०२५
दावा निकाल तारीख – ०३/१२/२०२५
**निशाणी –**

# हुकूमनामा

## जुन्नर येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब क स्तर यांचे न्यायालयात

**रे.मु.नं.५८६/२०२५**

**श्री. विलास महादू फापाळे**
वय : ५७ वर्षे, धंदा :- शेती
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९
मोबाईल नं.- ९१७२०४३०८५ **वादी**

**विरुद्ध**

१) **श्री. गोविंद महादू फापाळे**
वय: ६३ वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

**कै. गोपाळ महादू फापाळे मयत तर्फे वारस**

२) **श्रीमती. कुंदा गोपाळ फापाळे**
वय: ४८ वर्षे, धंदा :- गृहिणी,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

३) **श्री. मोहन गोपाळ फापाळे**
वय: ३१ वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

४) **शोभा गोपाळ फापाळे उर्फ सौ. शुभांगी सुहास डेरे**

वय: ३३ वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

**कै. जालिंदर महादू फापाळे मयत तर्फे वारस**

५) **श्रीमती मंदा जालंदर फापाळे**
वय: ६० वर्षे, धंदा :- गृहिणी,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

६) **श्री. दिनेश जालंदर फापाळे**
वय: ३७ वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

७) **सौ. दिपाली मंगेश नलावडे**
वय: ३३ वर्षे, धंदा :- गृहिणी,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

८) **सौ. सुनिता सतीश घंगाळे**
वय: ४२ वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

९) **सौ. मनिषा यशवंत येंधे**
वय: ४० वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९

**कै. राहीबाई अहिलाजी डुंबरे उर्फ सत्यभामा अहिलाजी (बबन) भाऊ पा. डुंबरे मयत तर्फे वारस**

१०) **श्री. देवराम अहिलाजी डुंबरे**

वय: ७४ वर्षे, धंदा :- शेती,
रा. मु. पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९ **प्रतिवादी**

**दावा – सरस निरसमानाने वाटप करुन कब्जा मिळणेचा**
**हिंदू वारस कायदा कलम ६ व ८**

**दावा विषय – ८९२/-**

**दावा विषयीची किंमत रुपये – १४९ /-**

**वादी मे. कोर्टास अत्यंत नम्रपणे कळवितात की,**

१) वादी हे वर नमूद रा. मु. फापाळेशिवार, पो. ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे- ४१२४०९ या पत्यावरील कायमस्वरूपी राहणार असून, प्रतिवादी क्र. १ ते १० हे नमूद पत्यावरील कायमस्वरूपी रहिवासी आहेत. सदरची कलम २ मधील दावा मिळकत हि मा. कोर्टाच्या स्थळसीमेत गाव मौजे ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९ येथील असल्याने सदरचा दावा दाखल करून तो चालवण्याचा व निर्णय देण्याचा अधिकार या मे. कोर्टास पूर्ण अधिकार आहे.

२) **मिळकतीचे वर्णन** :- तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, तसेच मे. सहाय्यक दुय्यम निबंधक साहेब जुन्नर, यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे ओतुर येथील वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत पुढीलप्रमाणे –

| खाते क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु./ पैसे) |
|---|---|---|---|
| १२९४ | २६/२/अ/२ | एकूण क्षेत्र ०.३५.०० | १.७५ |
| १२९४ | २६/२/ई | एकूण क्षेत्र ०.०२.०० | ०.१२ |
| १२९४ | ३७/२/ब | एकूण क्षेत्र ०.१४.०० | ०.५ |
| १२९४ | ३७/३/अ | एकूण क्षेत्र ०.३७.०० | १.२५ |
| १२९४ | ३९/२/अ | एकूण क्षेत्र ०.१८.०० | ०.८४ |

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे : -**

| खाते क्र. | गट नं. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १२९४ | २६/२/अ/२ | रस्ता | गट नं. २६/१ | रस्ता | गट नं. २६/२/अ१ |
| १२९४ | २६/२/ई | गट नं. २६/२ड/१ | गट नं. २६/२फ | गट नं. २६/२फ | गट नं. २६/२क |
| १२९४ | ३७/२/ब | मुरलीधर फापाळे यांचे क्षेत्र | गट नं. ३७/२/अ/२ | गट नं. ३७/२/अ/२ | रस्ता |
| १२९४ | ३७/३/अ | गट नं. ३७/३ब | किसन फापाळे यांचे क्षेत्र | रस्ता | रामदास बबन साबळे यांचे क्षेत्र |
| १२९४ | ३९/२/अ | अविनाश फापाळे यांचे क्षेत्र | गट नं. ३७/२अ/२ | मुरलीधर फापाळे यांचे क्षेत्र | रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक जमीन मिळकत त्यातील बोअरवेल, वहितीपड, विहीरपड व पाणी वापर सामाईक हिस्सा, दगड, माती, काष्ट, पाषाण, झाड झाडोरा, जल, तरू इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व सदर मिळकतीमध्ये जाणे येणेचे रस्त्याचे, वाहिवाटीचे व इजमेंटचे हक्क, उपभोगाच्या हक्कासहित दरोबस्त घर मिळकत असे.

येथून पुढे सोयीसाठी वर नमूद मिळकतीचा उल्लेख **"दावा मिळकत"** असा केला आहे.

३) वादी यांचा प्रतिवादी क्र. १ हे सख्खा भाऊ आहे. वादी यांचे प्रतिवादी क्र. २ व ५ हे भावजय चुलते आहे. वादी यांचे प्रतिवादी क्र. ३, ४, ६ ते ९ पुतणे – पुतणी (मयत भावाची मुले) आहे. वादी यांचा प्रतिवादी क्र. १० हा भाचा (मयत बहिणीचा मुलगा) असे नातेसंबंध आहेत. सदर मिळकती संदर्भात कै. गोपाळ महादू फापाळे यांचे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात प्रतिवादी क्र. २ ते ४ हे पत्नी व मुले या नात्याने कायदेशीर वारस आहेत. तसेच कै. जालंदर महादू फापाळे यांचे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात प्रतिवादी क्र. ५ ते ९ हे पत्नी व मुले या नात्याने कायदेशीर वारस आहेत. सदर बाबीची नोंद यापूर्वीच महसूल अभिलेखात झालेली आहे. सदर मिळकती संदर्भात इतर अधिकारात असलेले कै. राहीबाई अहिलाजी डुंबरे उर्फ सत्यभामा अहिलाजी (बबन) भाऊ पा. डुंबरे यांचे दि.

०८/१०/२००१ रोजी निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात प्रतिवादी क्र. १० हे कायदेशीर वारस आहेत. तसेच कै. लक्ष्मीबाई नाथा भोर उर्फ जाईबाई नाथा भोर यांचे दि. २६/०८/२०१२ रोजी त्यांचे विनावारस निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० हेच कायदेशीर वारस आहेत.

४) सदरच्या नमूद दाव्यात कलम २ मध्ये असलेली वाद मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित मालकीची असून प्रत्यक्षात सदरच्या मिळकतीची ताबा व वहिवाट पूर्वापार वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्याकडे आहे. कलम २ मधील मिळकतीत असणारी पिके हे वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० हेच घेत आलेले आहे. वर नमूद कलम २ मधील मिळकत वादी यांचे नावे करण्याचे प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी अनेक वेळा वचन व आश्वासन दिलेले होते. वर नमूद कलम २ मधील मिळकत हि वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांची एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची असून सदरच्या मालमत्तेचा उपभोग घेण्याचा व त्यांची बाबत योग्य ती विल्हेवाट लावण्याचा / निर्णय घेण्याचा अधिकार वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांना आहे.

५) वर नमूद कलम २ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकत वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांची एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत असल्याने त्यांना अधिकार प्राप्त झालेली असून, प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी वचन दिलेले प्रमाणे दावा मिळकतीत वादी यांचा कायदेशीर हक्क व हिस्सा आहे. उपरोक्त वर नमूद कलम २ मधील वाद मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्यामध्ये असणाऱ्या क्षेत्राचे वाटप होणे बाकी आहे. त्यातीलच क्षेत्राचे वाटप व्हावे अशी वादी यांची अपेक्षा आहे. सदर मिळकत वादी यांच्या प्रत्यक्ष ताबे वहिवाटीत आहे. तसेच सदर वाद मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी वादी यांचे शिवाय अन्य कोणासही वाटप करून देण्याचा अथवा तबदिल करून देण्याचा लेखी अथवा तोंडी शब्द देण्यात आलेला नव्हता व नाही.

६) **वादी पुढे मे. कोर्टास कळवितात की,** प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी तोंडी वाटपाने वादी यांस वचन दिले असल्याने वादी ह्यांचा दावा मिळकतीत कायदेशीर हिस्सा होता व आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्याकडे अनेकवेळा मिळकतीचे वाटप करण्याची इच्छा तोंडी बोलून दाखविली होती. परंतु प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी त्यांस प्रतिसाद दिला

नाही. तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्यातील नातेसंबंध पाहता त्यानंतर वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्यात वाटणी करणेवरून अनेक वेळा चर्चा झाली असता प्रतिवादी क्र. १ ते १० हे वादी यांना आपण सध्या वाटणी करायला नकोच, असे म्हणून वाटप करणेस नकार देवून चालढकल केली. त्यास शेवटी दि. १०/०८/२०२५ रोजी झालेल्या घरगुती बैठकीत प्रतिवादी क्र. १ ते १० हे वाटणीपत्र करण्यास नकार दिला त्यामुळे वादी यांना नाईलाजास्तव वाटणीकामी दावा लावणे आवश्यक व क्रमप्राप्त झाले आहे.

७) वादी यांची केस खरी असून, न्यायाचा तराजू वादी यांच्या बाजूने आहे. वादी यांना सदर दावा मिळकतीतील त्यांच्या हिश्श्यास येणारी मिळकत हि स्वत:ला जमीन कसायची आहे. म्हणून वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते १० यांना सामंजस्याने सदर दावा मिळकतीत त्यांचा हिस्सा वेगळा करून मागितला परंतु प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी वादी यांची मागणी झुगारून दिली होती व आहे.

८) **दाव्यास कारण** – वादी यांना प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दि. १०/०८/२०२५ चे घरगुती बैठकीत वाटप करून देण्यास नकार दिला तेंव्हा सदर दाव्यास कारण घडले व त्यानंतर रोजचे रोज घडत आहे.

९) **दाव्याची आकारणी-** प्रस्तुत दावा हा सरसनिरसमानाने वाटप करून मिळणेचा असून, वादीने दाव्याची आकारणी दावा मिळकतीचा वर नमूद कलम २ मधील चा एकूण सारा रु ४ पैसे ४६ चे २०० पट म्हणजेच रक्कम रु. ८९२/- यापैकी वादी यांचा १/६ म्हणजेच रक्कम रु. १४९/- चे अंकावर वादीने मे. कोर्टाचे अधिकार करीता व ॲडव्होकेट फी साठी दावा विषयाची किंमत तितकीच केली आहे

१०) वादीने या न्यायालयाव्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयात दावा दाखल केलेला नाही.

११) **तरी मे. कोर्टास नम्र विनंती कि,**

अ) वादी यांचा दावा मान्य करण्यात यावा.

ब) वादी यांचा दाव्यात नमूद हिस्सा सरसनिरस मानाने वाटप करून हिस्सा पृथकपणे करून देण्याचा हुकुम व्हावा.

क ) दाव्याचा सर्व खर्च वादी यांना प्रतिवादी क्र. १ ते १० यांचेकडून देण्याचा हुकुम करण्यात यावा.

ड) जरूर तर दावा दुरुस्तीची परवानगी असावी.

इ ) इतर योग्य ते न्यायाचे हुकुम वादींचे लाभात व्हावेत.

**आज दिनांक- ०१/१२/२०२५ रोजी मे. आनंत हिंमतराव बाजड सहदिवाणी न्यायाधिश क स्तर, जुन्नर, जि. पुणे यांचेसमोर वादी तर्फे ॲड. मयुरी शिवाजी गायकवाड व प्रतिवादी तर्फे ॲड. संतोष भरत तांबे यांचे समक्ष तडजोड पुरशीस नि. 13 व मेडीयटर रिपोर्ट नि. 11 A प्रमाणे वादी व प्रतिवादीमध्ये आपआपसात तडजोड झालेली आहे. ती तडजोड पुढीलप्रमाणे-**

१. वादीने प्रतिवादी नं. १ ते १० यांच्या विरुद्ध दावा मिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप करून मिळणेकामी दावा दाखल केलेला आहे.

वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांचेमध्ये गाव पातळीवर घरगुती बैठका होऊन वाटपाचा वाद पंचासमक्ष मिटलेला आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दावा मिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप आपसात करून घेतले असून त्यांची वाटपाच्याकामी तडजोड झालेली आहे. सदर तडजोड ही खालील प्रमाणे झालेली आहे.

**अ) वादी श्री. विलास महादू फापाळे यांना वाटपात देण्यात आलेले सामाईक क्षेत्र –**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, तसेच मे. सहाय्यक दुय्यम निबंधक साहेब जुन्नर, यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे ओतुर येथील वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत पुढीलप्रमाणे –

| खाते क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु./ पैसे) |
|---|---|---|---|
| १२९४ | ३९/२/अ | एकूण क्षेत्र ०.१८.०० | ०.८४ |

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे : -**

| खाते क्र. | गट नं. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १२९४ | ३९/२/अ | अविनाश फापाळे यांचे क्षेत्र | गट नं. ३७/२अ/२ | मुरलीधर फापाळे यांचे क्षेत्र | रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक जमीन मिळकत त्यातील बोअरवेल, वहितीपड, विहीरपड व पाणी वापर सामाईक हिस्सा, दगड, माती, काष्ट, पाषाण, झाड झाडोरा, जल, तरू इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व सदर मिळकतीमध्ये जाणे येणेचे रस्त्याचे, वाहिवाटीचे व इजमेंटचे हक्क, उपभोगाच्या हक्कासहित दरोबस्त घर मिळकत असे.

**ब) प्रतिवादी क्र. १ श्री. गोविंद महाद्रू फापाळे यांना वाटपात देण्यात आलेले क्षेत्र –**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, तसेच मे. सहाय्यक दुय्यम निबंधक साहेब जुन्नर, यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे ओतुर येथील वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत पुढीलप्रमाणे –

| खाते क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु./ पैसे) |
|---|---|---|---|
| १२९४ | ३७/३/अ | एकूण क्षेत्र ०.३७.०० यापैकी ०.२२.०० | १.२५ यापैकी ०.७४ |

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे : -**

| खाते क्र. | गट नं. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १२९४ | ३७/३/अ | गट नं. ३७/३ब | किसन फापाळे यांचे क्षेत्र | वादी प्रतिवादी क्र. १, ३, ६ यांचे क्षेत्र | रामदास बबन साबळे यांचे क्षेत्र |

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक जमीन मिळकत त्यातील बोअरवेल, वहितीपड, विहीरपड व पाणी वापर सामाईक हिस्सा, दगड, माती, काष्ट, पाषाण, झाड झाडोरा, जल, तरू इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व सदर मिळकतीमध्ये जाणे येणेचे रस्त्याचे, वाहिवाटीचे व इजमेंटचे हक्क, उपभोगाच्या हक्कासहित दरोबस्त घर मिळकत असे.

**क) प्रतिवादी क्र. २ श्रीमती. कुंदा गोपाळ फापाळे, प्रतिवादी क्र. ३ श्री. मोहन गोपाळ फापाळे, प्रतिवादी क्र. ४ शोभा गोपाळ फापाळे उर्फ सौ. शुभांगी सुहास डेरे यांना वाटपात देण्यात आलेले क्षेत्र –**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, तसेच मे. सहाय्यक दुय्यम निबंधक साहेब जुन्नर, यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे ओतुर येथील वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत पुढीलप्रमाणे –

| खाते क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु./ पैसे) |
|---|---|---|---|
| १२९४ | २६/२/अ/२ | एकूण क्षेत्र ०.३५.०० यापैकी ०.२३.०० | १.७५ यापैकी १.१५ |
| १२९४ | २६/२/ई | एकूण क्षेत्र ०.०२.०० | ०.१२ |

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे : -**

| खाते क्र. | गट नं. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १२९४ | २६/२/अ/२ | रस्ता | गट नं. २६/१ | प्रतिवादी क्र. ५ ते ९ यांचे क्षेत्र व रस्ता | गट नं. २६/२/अ१ |
| १२९४ | २६/२/ई | गट नं. २६/२ड/१ | गट नं. २६/२फ | गट नं. २६/२फ | गट नं. २६/२क |

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक जमीन मिळकत त्यातील बोअरवेल, वहितीपड, विहीरपड व पाणी वापर सामाईक हिस्सा, दगड, माती, काष्ट, पाषाण, झाड झाडोरा, जल, तरू इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व सदर मिळकतीमध्ये जाणे येणेचे रस्त्याचे, वाहिवाटीचे व इजमेंटचे हक्क, उपभोगाच्या हक्कासहित दरोबस्त घर मिळकत असे.

**ड) प्रतिवादी क्र. ५ श्रीमती मंदा जालंदर फापाळे, प्रतिवादी क्र. ६ श्री. दिनेश जालंदर फापाळे, प्रतिवादी क्र. ७ सौ. दिपाली मंगेश नलावडे, प्रतिवादी क्र. ८ सौ. सुनिता**

**सतीश घंगाळे, प्रतिवादी क्र. ९ सौ. मनिषा यशवंत येंधे यांना वाटपात देण्यात सामाईक आलेले क्षेत्र :-**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, तसेच मे. सहाय्यक दुय्यम निबंधक साहेब जुन्नर, यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे ओतुर येथील वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत पुढीलप्रमाणे –

| खाते क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु./ पैसे) |
|---|---|---|---|
| १२९४ | २६/२/अ/२ | एकूण क्षेत्र ०.३५.०० यापैकी ०.१२.०० | १.७५ यापैकी ०.६ |
| १२९४ | ३७/२/ब | एकूण क्षेत्र ०.१४.०० | ०.५ |

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे : -**

| खाते क्र. | गट नं. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १२९४ | २६/२/अ/२ | रस्ता, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचे क्षेत्र | गट नं. २६/१ | रस्ता | गट नं. २६/२/अ१ |
| १२९४ | ३७/२/ब | मुरलीधर फापाळे यांचे क्षेत्र | गट नं. ३७/२/अ/२ | गट नं. ३७/२/अ/२ | रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक जमीन मिळकत त्यातील बोअरवेल, वहितीपड, विहीरपड व पाणी वापर सामाईक हिस्सा, दगड, माती, काष्ट, पाषाण, झाड झाडोरा, जल, तरू इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व सदर मिळकतीमध्ये जाणे येणेचे रस्त्याचे, वाहिवाटीचे व इजमेंटचे हक्क, उपभोगाच्या हक्कासहित दरोबस्त घर मिळकत असे.

**इ) वादी श्री. विलास महादू फापाळे, प्रतिवादी क्र. १ श्री. गोविंद महादू फापाळे, प्रतिवादी क्र. ३ श्री. मोहन गोपाळ फापाळे, प्रतिवादी क्र. ६ श्री. दिनेश जालंदर फापाळे यांना वाटपात देण्यात आलेल्या सामाईक क्षेत्र-**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, तसेच मे. सहाय्यक दुय्यम निबंधक साहेब जुन्नर, यांचे हद्दीतील व जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती जुन्नर, यांचे हद्दीतील गाव मौजे ओतुर येथील वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत पुढीलप्रमाणे –

| खाते क्र. | गट नंबर | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु./ पैसे) |
|---|---|---|---|
| १२९४ | ३७/३/अ | एकूण क्षेत्र ०.३७.०० यापैकी ०.१५.०० | १.२५ यापैकी ०.५१ |

**यांसी चतु:सीमा खालीलप्रमाणे : -**

| खाते क्र. | गट नं. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| १२९४ | ३७/३/अ | प्रतिवादी क्र. १ यांचे क्षेत्र | किसन फापाळे यांचे क्षेत्र | रस्ता | रामदास बबन साबळे यांचे क्षेत्र |

येणेप्रमाणे चतु:सीमा पूर्वक जमीन मिळकत त्यातील बोअरवेल, वहितीपड, विहीरपड व पाणी वापर सामाईक हिस्सा, दगड, माती, काष्ट, पाषाण, झाड झाडोरा, जल, तरू इत्यादी तदंगभूत वस्तुसहित व सदर मिळकतीमध्ये जाणे येणेचे रस्त्याचे, वाहिवाटीचे व इजमेंटचे हक्क, उपभोगाच्या हक्कासहित दरोबस्त घर मिळकत असे.

**३)** वरीलप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांचेमध्ये तडजोड झालेली असून त्यांची तडजोडीनुसार त्यांची वाटपात आलेल्या क्षेत्रात मालकी हक्काने कब्जा, ताबे वहिवाट कायम आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांना वाटपात आलेल्या क्षेत्राबाबत यापुढे प्रतिवादी क्र. १० कोणतीही हिल्ला हरकत अगर अडथळा करावयाचा नाही.

**४)** वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांना वाटपात आलेल्या क्षेत्राबाबत यापुढे प्रतिवादी क्र. १० यांची यासाठी वेगळ्या सहमतीची येथून पुढे आवश्यकता राहणार नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ हिंदू कुटूंबातील आहेत व त्याप्रमाणे प्रत्येक जण एकत्र हिंदू कुटूंबाचा एक घटक (कोपार्सनर) आहेत. उपरोक्त वाटप दाव्यात वर्णन केलेली वाद मिळकत वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्या एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकीची

तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांची एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची मिळकत असुन सदर वाद मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचा सामाईकातील हिस्सा आहे.

५) गाव मौजे ओतूर येथील वादी यांना वाटपात आलेल्या गट नं. ३९/२/अ मध्ये पूर्व – उत्तर बाजूला विहीर आहे. सदर विहिर, विहीरभांडे, विहीरपड, विहीरभांडे पाण्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ यांना सामाईक हिस्सा जाण्या – येण्याच्या हक्कासहित देण्यात आलेला आहे. यातील विहीरपाणी भांडे हिस्सामधून आवश्यक ते वीज वापर कनेक्शन, विहीर व पाईपलाईन ही व्यवस्था स्वतंत्र करायची आहे. तसेच या व्यवस्था सामाईक असतील तर प्रत्येकाने स्वतःच्या हिस्स्याप्रमाणे खर्च करायचा आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ यांना वाटपात आलेल्या गट नं. ३७/३/अ मधील ०.२२.०० (हे.आर.चौ.मी मधील हिश्यामध्ये पूर्व बाजुने स्वःखर्चाने घेतलेला बोरवेल आहे सदर बोरवेल संपूर्ण हिस्सा प्रतिवादी क्र.१ यांना देण्यात येत आहे. गट नं. ३७/३/अ मधील वादी व प्रतिवादी क्र. १, ३, ६ यांना वाटपात आलेल्या पश्चिम बाजूने (शाळेच्या बाजूने) दिलेल्या सामाईक क्षेत्रामध्ये वादी यांना घरासाठी व इतर ठेवलेल्या हिश्यामध्ये वादी यांनी स्वःखर्चाने घेतलेला बोरवेल आहे सदर बोरवेल संपूर्ण हिस्सा वादी यांना देण्यात येत आहे.

६) गाव मौजे ओतूर येथील गट नं. २६/३ मधील ०.०२.०० (हे.आर.चौ.मी) मध्ये असणऱ्या विहिरीमध्ये वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाचा वडिलोपार्जित हिस्सा आहे. सदर संपूर्ण हिस्सा वाटपाने प्रतिवादी क्र. ३ यांना देण्यात आलेला आहे. सदर हिस्सा प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावे करण्यासाठी वादी व प्रतिवादी क्र. १, २, ४ ते १० ते आवश्यक त्या कागदपत्रांवर व कार्यालयात प्रतिवादी क्र. ३ यांना सह्या देतील त्यास भविष्यात अडथळा निर्माण करणार नाही असे मान्य व कबूल करतात.

७) गाव मौजे गट नं. ३७/३/अ मधील वादी श्री. विलास महादू फापाळे, प्रतिवादी क्र. १ श्री. गोविंद महादू फापाळे, प्रतिवादी क्र. ३ श्री. मोहन गोपाळ फापाळे, प्रतिवादी क्र. ६ श्री. दिनेश जालंदर फापाळे यांना वाटपात आलेल्या क्षेत्राच्या पश्चिम बाजूने २ आर एवढे क्षेत्र शाळेच्या मैदानासाठी वापरात आहे तसेच भविष्यात सदर जागेची शाळेनी मागणी केली तर वादी व प्रतिवादी क्र. १, ३, ६ हे त्याच्या सामाईक क्षेत्रातून देतील तसेच शाळेचे पटांगण सोडून पश्चिम बाजूने वादी श्री. विलास महादू फापाळे, त्यालगत पूर्व बाजूने

प्रतिवादी क्र. १ श्री. गोविंद महादू फापाळे त्यालगत पूर्व बाजूने प्रतिवादी क्र. ३ श्री. मोहन गोपाळ फापाळे त्यालगत पूर्व बाजूने प्रतिवादी क्र. ६ श्री. दिनेश जालंदर फापाळे अश्याप्रमाणे घरे आहे. सदर घरे हे त्यांनी स्व:खर्चाने बांधलेली आहे त्यामुळे सदर घरे हि त्यांना वाटपाने देण्यात येत आहे. सदर गट नं. ३७/३/अ मधील सामाईक ठेवलेले क्षेत्र हे फक्त घरांसाठी ठेवलेली आहे. सदर घरासाठी सामाईक ठेवलेल्या क्षेत्राच्या उत्तर बाजूने शाळेच्या पटांगणासाठी दिलेल्या जागेमधून पश्चिम – पूर्व १० (दहा) फुट रस्ता वादी व प्रतिवादी सामाईक वापरासाठी ठेवण्यात येत आहे.

८) वादी यांनी प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्याविरुद्ध सरसनिरस मानाने वाटप मिळावे म्हणून दावा दाखल केलेला असून वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्यामध्ये तडजोड झालेली असून दाव्यात नमूद केलेल्या मिळकतीबाबत वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्यात झालेल्या वाटपाने क्षेत्र मिळावे व वाद मिळकतीत प्रतिवादी क्र. १० यांना कोणताही हिस्सा नको असल्याने प्रतिवादी क्र. १० यांनी सदर उपरोक्त नमूद मिळकतीमधील सर्व हक्क स्व:इच्छेने सोडून दिलेला आहे. वादी यांचा प्रतिवादी क्र. १ हे सख्खा भाऊ आहे. वादी यांचे प्रतिवादी क्र. २ व ५ हे भावजय चुलते आहे. वादी यांचे प्रतिवादी क्र. ३, ४, ६ ते ९ पुतणे – पुतणी (मयत भावाची मुले) आहे. वादी यांचा प्रतिवादी क्र. १० हा भाचा (मयत बहिणीचा मुलगा) असे नातेसंबंध आहेत. वरील नमूद वाद मिळकतीत एकत्र कुटुंबाची वडिलोपार्जित मालकी हक्काची असून वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांना हक्क प्राप्त झालेले असून वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांचा कब्जा, ताबे व वहिवाट कायमस्वरूपी होती व आहे. यामुळे वादी तसेच प्रतिवादी क्र. १ ते १० यांना सर्व हक्क व अधिकार प्राप्त होत आहे. असे जरी असले तरी प्रतिवादी क्र. १० यांना सदर वाद मिळकतीत कोणताही हिस्सा नको आहे. यासाठी प्रतिवादी क्र. १० हे नमूद वाद मिळकतीत येत असलेला सर्व हिस्सा, हक्क हे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९यांच्या नावाने हिस्सा व हक्क सोडून दिलेले आहेत. त्यामुळे वरील वाद मिळकतही सदरच्या तडजोडनाम्यामध्ये नमूद केलेप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांना यापुढे आवश्यक त्या शासकीय कार्यालय ठिकाणी कागदपत्रे वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचे नावाने करुन घ्यावी. प्रतिवादी क्र. १० यांनी वादी व प्रतिवादी क्र. १ ते ९ यांच्यावरील प्रेमापोटी वरील मिळकतीत कोणताही हिस्सा व हक्क नको आहे. यामुळे सदर

मिळकतीशी प्रतिवादी क्र. १० यांचा कोणताही हितसंबंध राहिलेला नाही. असे मान्य व कबूल करतात.

९) वादी व प्रतिवादी प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी सदर तडजोडीप्रमाणे दावा मिळकतीचे वाटपाप्रमाणे महसूल अभिलेखात ७/१२ (सातबारा) सदरी व सिटी सर्व्हे रेकॉर्डच्या दफ्तरी नोंदी होणे कामी योग्य त्या कागदपत्रांवर सह्या अथवा संमंती द्यावयाची आहे.

१०) वादी व प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दाव्याचा खर्च सोसलेला आहे.

तरी वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांच्यामध्ये झालेल्या तडजोडीप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा व दाव्याच्या खर्चाबाबत कोणताही हुकूम करणेत येऊ नये.

**निशाणी १ वर न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केला.**

## ORDER

1. The Present suit is disposed of, as per the terms and conditions mentioned in compromise pursis Exh.13 and mediator report Exh.11A.
2. The terms and conditions shall from the part of compromise decree.
3. The Court fee be returned to the plaintiff as per the rules, if any.
4. Decree be drawn up accordingly.

Sd/xxx

**(S.S.JAIN)**

Date:03/12/2025

4th Jt. Civil Judge Junior Division,
Junnar

# खर्चाचा आकडा

| वादी | रुपये | प्रतिवादी | रुपये |
|---|---|---|---|
| १. दाव्यास मुद्रांक निशाणी १ | 200 /- | १. वकीलपत्र नि. ६ | १०/- |
| २. वकीलपत्र नि. २ | १०/- | २. वकील फी. | 60 /- |
| ३. दाखल कागदपत्रास मुद्रांक नि. ३ | 30 /- | | |
| ४. वकील फी. | 60 /- | | |
| एकूण | 300 /- | एकूण | 70 /- |

**आज दिनांक ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सही व मेहरबान न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.**

**लिपिक –**

**वादीचे वकील –** Gaikwad.

**ॲड. मयुरी शिवाजी गायकवाड**

**प्रतिवादीचे वकील –** ANTOSH..

**ॲड. संतोष भरत तांबे**

03/12/25

**(श्रेया शितल जैन)**
**सहदिवाणी न्यायाधिश क स्तर**
**जुन्नर, जि. पुणे**

( वरील प्रकरणातील संबधीत पक्षकारांना व वकीलांना सुचीत करण्यात येते की. - सदर प्रकरणातील त्यांनी दाखल केलेले मुळ दस्तऐवज/कागदपत्र त्यांनी परत घेवुन जावीत अन्यथा ती विहीत मुदतीनंतर नष्ट करण्यात येतील याची नोंद घ्यावी. )